# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.06.2026** **वार:शनिवार**

---

1. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी गुणवत्ता हेच मुख्य सूत्र असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन; पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजनेअंतर्गत 2 हजार कोटी रुपयांचा प्रोत्साहनपर निधी वितरीत
2. संरक्षण सामुग्रीसाठी आवश्यक ॲल्युमिनियम निर्मिती प्रकल्पाची संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते नागपूरमध्ये पायाभरणी
3. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज कोल्हापूर दौऱ्यावर; महालक्ष्मी मंदिर परिसरातील विविध कामांचा करणार प्रारंभ
4. राज्याचा शालेय शिक्षण विभाग आणि गुगल यांच्यात कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षणासाठी करार आणि
5. ज्येष्ठ शिक्षणतज्ञ प्राध्यापक बी. टी. देशमुख यांचं निधन

**<u>पंतप्रधान</u>**

जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी शिक्षण, कौशल्य, सेवा, उत्पादन अशा सर्वच पातळ्यांवर गुणवत्ता हेच यशाचं मुख्य सूत्र आहे; उत्कृष्टता हीच भारताची ओळख बनली पाहिजे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजनेअंतर्गत, 2 हजार 400 कोटी रुपयांच्या प्रोत्साहनपर निधीचं वितरण काल पंतप्रधानांच्या हस्ते नवी दिल्लीत झालं, त्यावेळी ते बोलत होते. विकसित भारताचा मार्ग केवळ गुंतवणुकीवर नाही, तर कौशल्य, प्रतिभा आणि नवोन्मेषाच्या शक्तीवर आधारित असेल, असं ते म्हणाले.

देशातल्या 200 ठिकाणी या रोजगार कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यात, पुण्यातल्या चार ठिकाणांचा समावेश होता. प्रोत्साहनपर निधी वितरित करण्यापूर्वी, पंतप्रधानांनी विज्ञान भवन इथं काही तरुणांशी प्रत्यक्ष संवाद साधला. या कार्यक्रमाला केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविय उपस्थित होते. या कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले…

**दुनिया भारत के युवाओं की क्षमता को भली भांति पहचानने लगी है और ऐसे समय में हमारी कोशिश है कि भारत का हर युवा अपनी क्षमता को अवसर में बदल सके और इसी सोच के साथ प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना का आरंभ हुआ है।यह रोजगार योजना सामान्य तौर पर सोचे जानी वाली रोजगार योजना से बहुत आगे बढ़कर, पहली नौकरी पाने वाली युवा के सपनों को शक्ति देने वाली योजना है। ये युवा और उद्योगों के बीच एक मजबूत सेतू बनाने वाली योजना है।**

**<u>राजनाथसिंह-नागपूर</u>**

केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते काल, यंत्र इंडिया लिमिटेडच्या, नागपूर मधल्या, अंबाझरी आयुध निर्माणीतील 10 हजार टन क्षमतेच्या अत्याधुनिक अल्युमिनियम एक्स्ट्रूजन प्रेस प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. हा प्रकल्प म्हणजे देशांतर्गत उत्पादनक्षमतेला चालना देणारा महत्त्वाचा टप्पा आहे, असं राजनाथ सिंह याप्रसंगी बोलताना म्हणाले. ही यंत्रणा आधुनिक लढाऊ विमानं, क्षेपणास्त्र आणि प्रगत अंतराळ संशोधन उपक्रमांसाठी वजनाला हलक्या आणि मजबूत धातूची निर्मिती करेल, असं सिंह म्हणाले. यावेळी त्यांनी संरक्षण उत्पादन क्षेत्रातील देशाच्या प्रगतीचा

आढावा घेतला. हा प्रकल्प आत्मनिर्भर आणि विकसित भारताच्या दिशेनं टाकलेलं महत्त्वाचं पाऊल आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. या अत्याधुनिक प्रकल्पामुळे नागपूर आणि विदर्भ, संरक्षण उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाचं केंद्र म्हणून विकसित होईल असं मुख्यमंत्री म्हणाले.

**अमितशहा- कोल्हापूर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. पश्चिम महाराष्ट्र विकास आराखड्याअंतर्गत श्री महालक्ष्मी मंदिर परिसरातील नूतन प्रदक्षिणा मार्ग आणि परिवार देवता मंदिर संवर्धन कामकाजाचा प्रारंभ त्यांच्या हस्ते होणार आहे. श्री अंबाबाई मंदिर तीर्थक्षेत्र विकासासाठी राज्य सरकारनं एक हजार 445 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यावेळी कोल्हापुरातल्या पोलीस परेड मैदानावर शहा यांची जाहीर सभा होणार आहे. त्यानंतर, इचलकरंजीत जवाहर साखर कारखान्याच्या नामांतर सोहळा कार्यक्रमालाही ते उपस्थित राहतील.

**योगदिन-बातमीपत्र वेळबदल**

आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम उद्या कोलकाता इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण सकाळी साडे सहा वाजल्यापासून आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून केलं जाणार आहे. त्यामुळे पुणे केंद्रावरून प्रसारित होणारे 'प्रादेशिक बातमीपत्र' या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणानंतर प्रसारित करण्यात येईल. पुण्यात महानगरपालिका आणि जिल्हा प्रशासन संयुक्तपणे, स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा करणार आहे. या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावं असं आवाहन महापौर मंजुषा नागपुरे यांनी केलं आहे.

**राज्यशासन-गुगल करार**

राज्यातील शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाचं प्रगत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी, राज्याचा शालेय शिक्षण विभाग आणि गुगल फॉर एज्युकेशन यांच्या दरम्यान काल करार झाला. या उपक्रमाअंतर्गत पुढील दीड वर्षांच्या कालावधीत राज्यातल्या चार लाखांहून अधिक शिक्षकांना ‘गुगल एआय एज्युकेटर सिरीज’ अंतर्गत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली, आयोजित कार्यक्रमात गुगल फॉर एज्युकेशन विभागाचे उपाध्यक्ष ख्रिस फिलिप्स, आणि शालेय शिक्षण विभागाचे सहसचिव ताशीलदार यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या उपक्रमासाठी राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नसून संपूर्ण प्रशिक्षण गुगलमार्फत विनामूल्य उपलब्ध करून दिलं जाणार असल्याचं भुसे यांनी यावेळी सांगितलं.

**नीट**

वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची नीट पुनर्परिक्षा सुरळीत, निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीनं आयोजित करण्यासाठी राष्ट्रीय चाचणी संस्था सज्ज असल्याचं संस्थेनं म्हटलं आहे. देशभरातल्या 551 आणि परदेशातल्या 14 शहरांमध्ये उद्या ही परीक्षा होत आहे. यासाठी 22 लाखांहून अधिक उमेदवारांनी नाव नोंदणी केली आहे. परीक्षेसाठी दोन लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली असल्याचं एनटीएनं कळवलं आहे.

'नीट-यूजी' पुनर्परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांसाठी, एनटीए नं 91 78 27 98 02 87 हा अधिकृत व्हॉट्सॲप नंबर जारी केला आहे. सर्व अधिकृत व्हॉट्सॲप संदेश याच क्रमांकावरील त्यांच्या व्हेरिफाईड खात्यावरूनच पाठवले जातील. कोणत्याही संदेशावर विश्वास ठेवण्यापूर्वी, त्यावर 'ब्लू व्हेरिफिकेशन टिक' अर्थात निळी खूण आणि "National Testing Agency" हे नाव असल्याची खात्री करण्याचा सल्ला संस्थेनं दिला आहे. दरम्यान नीट पुनर्परीक्षेच्या

पार्श्वभूमीवर 'टेलिग्राम' या समाजमाध्यमावर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय काल सर्वोच्च न्यायालयानं कायम ठेवला. केंद्र सरकारच्या या निर्णयाला टेलिग्रामनं न्यायालयात आव्हान दिलं होतं.

**पॉश**

पॉश कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरता राष्ट्रीय महिला आयोगानं कृती आराखडा निश्चित केला आहे. देशातील प्रत्येक कामाच्या ठिकाणी महिलांकरता सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी, 10 पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांच्या संस्थांना POSH ऑडिट बंधनकारक करण्यात आलं आहे. जनजागृती कार्यक्रम, शी बॉक्ससारखे उपक्रम तसंच सर्व कार्यालयांत अंतर्गत तक्रार समित्या अनिवार्य करण्यात आल्या आहेत. या 18 महत्त्वाच्या उपाययोजनांसंदर्भात आयोगानं सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांसह विविध यंत्रणांना निर्देश दिले आहेत. प्रत्येक कार्यस्थळ सुरक्षितता, समानता आणि सन्मानाचं केंद्र बनलं पाहिजे, असं आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी म्हटलं आहे.

**शिवसेना वर्धापन दिन**

शिवसेनेच्या साठाव्या वर्धापनदिनानिमित्त काल मुंबईत दोन वेगवेगळ्या कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनीचा कार्यक्रम गोरेगावमध्ये नेस्को इथं, तर शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा कार्यक्रम षण्मुखानंद सभागृहात झाला. यांनी आपल्या भाषणात शिंदे यांनी विरोधकांवर तर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली.

**निधन-अमरावती**

विदर्भातील ज्येष्ठ शिक्षणतज्ञ, अभ्यासू नेतृत्व, माजी आमदार प्राध्यापक बी. टी. देशमुख यांचं काल अमरावतीमध्ये वृद्धापकाळाने निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. त्यांच्या निधनाबद्दल शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. अनुशेषासह राज्यातील विविध प्रश्नांचा सखोल अभ्यास, लोकप्रतिनिधी म्हणून जनतेप्रति सदैव सेवाभाव आणि संसदीय आयुधांवरील प्रभुत्व ही आदरणीय भाऊंच्या योगदानाची वैशिष्ट्ये सर्वांसाठी अनुकरणीय आहेत, अश्या शब्दांत विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे यांनी देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**हवामान**

येत्या दोन दिवसात राज्याच्या चारही विभागात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.